महानिर्मिती कंपनीच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या अखत्यारितील मौजे वारेगांव, ता. कामठी, जि. नागपूर येथील सर्वे नं. १२१ मधील २.५० एकर (१.०० हेक्टर) जमिन जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत भिलगांव व अन्य तीन गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारावयाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता भाडेतत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण- २०१८/प्र.क्र.३१/ऊर्जा-४
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१९

संदर्भ: १) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. सी.ई.(सी)/जीइएन-III/११४/नं.५७६, दि. १६.०१.२०१८
२) महानिर्मिती कंपनीचे पत्र क्र. मु.अ.(स्था-३)/खापरखेडा/जागा/क्र.१२१२, दिनांक १७.०६.२०१९
३) महानिर्मिती कंपनीचा ईमेल दि. ०५.०८.२०१९

प्रस्तावना :-

महानिर्मिती कंपनीच्या दिनांक १६.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या अखत्यारितील मौजे वारेगांव, ता. कामठी, जि. नागपूर येथील सर्वे नं. १२१ मधील २.५० एकर (१.०० हेक्टर) जमिन जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत भिलगांव व अन्य तीन गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारावयाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता ३० वर्षाच्या भाडेतत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०८.१२.२०१७ च्या ठरावान्वये खालील अटींच्या अधीन राहून सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे:-

अ) सदर जागेच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव जमिन संपादन कायदा, १८९४ च्या कलम ४४अ नुसार तीस वर्षाच्या भाडेतत्वावर देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात यावा.

ब) महानिर्मिती कंपनीने शासनास किंमत अदा करुन घेतलेल्या जमिनीचे भाडे महानिर्मिती कंपनीस अदा करण्यासंदर्भात योग्य ते निर्देश प्राप्त करुन घेण्यासाठी महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात यावी.

क) महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने भाडेकरारा संदर्भात दिलेल्या अटी व शर्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास बंधनकारक राहतील.

ऊक्त प्रस्ताव महसुल व वन विभागास सादर केला असता त्या विभागाने महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाच्या दिनांक ०८.१२.२०१७ च्या ठरावामध्ये नमुद केलेल्या बाबीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या तसेच खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार मान्यता दिलेली आहे.

अटी व शर्ती:-

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या जमिनीची मालकी ऊर्जा विभागाची म्हणजेच महनिर्मिती कंपनीची राहील याबाबतचा उल्लेख भाडेपट्टी करारामध्ये करण्यात यावा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना ज्या कारणासाठी संपादित जमीन भाडेपट्टीने देण्यात येत आहे, त्या जमिनीचा वापर त्याच प्रयोजनासाठी करणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेवर बंधनकारक राहील. दुसऱ्या कोणत्याही अन्य प्रयोजनासाठी सदर जमिनीचा वापर करण्यात येऊ नये.

३) सदर जमीन संपादित करण्यात आलेली असल्याने ती वर्ग-२ म्हणूनच राहील.

४) संपादित जमिनीचा भाडेपट्टीने वापर करताना शासनाचे हित जोपासले जावे.

वरील सर्व वस्तूस्थिती विचारात घेता महानिर्मिती कंपनीच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या अखत्यारितील मौजे वारेगांव, ता. कामठी, जि. नागपूर येथील सर्वे नं. १२१ मधील २.५० एकर (१.०० हेक्टर) जमिन जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत भिलगांव व अन्य तीन गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारावयाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता ३० वर्षाच्या भाडेतत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त **वस्तूस्थिती** विचारात घेता महानिर्मिती कंपनीच्या खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या अखत्यारितील मौजे वारेगांव, ता. कामठी, जि. नागपूर येथील सर्वे नं. १२१ मधील २.५० एकर (१.०० हेक्टर) जमिन जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत भिलगांव व अन्य तीन गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उभारावयाच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता ३० वर्षाच्या भाडेतत्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या जमिनीची मालकी ऊर्जा विभागाची म्हणजेच महनिर्मिती कंपनीची राहील याबाबतचा उल्लेख भाडेपट्टी करारामध्ये करण्यात यावा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही संस्था सदर जमिन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने जमिन धारण करील.

३) सार्वजनिक हित विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेस सदर जमीन जलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता रूपये १/- (एक) प्रति वर्ष या नाममात्र दराने ३० वर्षाकरिता भाडेपट्टयाने देण्यात यावी.

४) महसूल व वन विभागाच्या व ऊर्जा विभागाच्या पुर्वपरवानगी शिवाय सदर जमिन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री/ देणगी देऊन/ अदलाबदल करुन/ गहाण ठेऊन/ खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणेद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल व वन विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमिनीचे पोट विभाजन करता येणार नाही.

५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विषयांकित शासकीय जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठीच करील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा तिच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची व ऊर्जा विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

६) सदर जमिनीचा ताबा मिळाल्यापासून ३ वर्षाच्या आत मंजूर प्रयोजनासाठी सदर जमिनीचा वापर सुरु करण्यात यावा तसेच प्रदान करण्यात आलेल्या जागेवर अतिक्रमण झाल्यास सदर अतिक्रमण निष्कासित करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील.

७) सदर जागेवरील नियोजित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/ सूचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी/ काळजी घेणे बंधनकारक राहील.

८) सदर जागेवरील नियोजित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, त्यांच्या वैध वहीवाटीस बाधा येणार नाही, तसेच सदर जागेस पोहोच रस्ता उपलब्ध करण्याची कार्यवाही करावी.

९) शासकीय जमीन भाडेपट्टयाने देताना अथवा भाडेपट्टयाने नुतनीकरण करताना करावयाचा करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ नुसार निष्पादित करणे बंधनकारक करण्यासंदर्भातील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-५/२००६/प्र.क्र.४३/ज-१, दि. ३१.१०.२००६ मधील मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) वरील अटी/ शर्तीपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास शर्तभंगाबाबत सदर शासकीय जमीन शासनजमा करण्याचा अधिकार शासनास राहील.

११) संपादित जमिनीचा भाडेपट्टीने वापर करताना शासनाचे हित जोपासले जावे.

१२) महानिर्मिती कंपनी त्यांना आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती विहित करण्याची मूभा महानिर्मिती कंपनीस राहील.

हा शासन निर्णय, महसूल व वन विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. १७ / अ-१, दिनांक ०८.०७.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१७४९०७२८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nanasaheb Rajaram Dhane

Digitally signed by Nanasaheb Rajaram Dhane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a71698611123263cde9d32423e9bb73044d91ed0cffad3b6267198ee5014159f, serialNumber=6c39e2858150dbdfcfe6cd25ed08adf59f4d2fd8c1ede1730735f604904bf3bb, cn=Nanasaheb Rajaram Dhane
Date: 2019.08.19 17:55:23 +05'30'

(ना. रा. ढाणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरिक्षा)-१, महाराष्ट्रमुंबई-४०००२०
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई-४०००२०
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखाधिकारी, मुंबई
१६. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
१७. मुख्यलेखा परिक्षक, स्थानिक निधीलेखा, कोकण भवन, मुंबई
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
२२. वित्त विभाग (व्यय-१६)
२३. नियोजन विभाग (कार्यासन-१४८३)
२४. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने
२५. निवड नस्ती